# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** प्रभाग क्र. ०४ मधील कळमना नाका नं. ०४ पासून ते पावनगाव रेल्वे
**{सा.बां.वि. झोन क्र. ०८}** क्रॉसिंग पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरिता रु. २,००,७०,१७६/- रक्कमेच्या प्राकलनास तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S./२१२/२०२३-२४ दि. २६/१०/२०२३ ला प्राप्त असून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये पद क्र. A४३९०२३७१९२० "पदशिर्ष १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत वायु गुणवत्ता अनुदान व्यय" मधून तरतूद उपलब्ध असून प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१. सदर कामाचा खर्च पद क्र. A४३९०२३७१९२० मधून करण्यात येईल.
२. प्रस्तुत कामास तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S./२१२/ २०२३-२४ दि.२६/१०/२०२३ तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
३. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 682/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 04/01/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लकडगंज झोन क्र. ०८ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. ०४ मधील कळमना नाका नं. ०४ पासून ते पावनगाव रेल्वे क्रॉसिंग पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरिता रु. २,००,७०,१७६/- रक्कमेच्या प्राकलनास तांत्रिक मान्यता क्र. CE/PWD/T.S./२१२/२०२३-२४ दि. २६/१०/२०२३ ला प्राप्त असून आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये पद क्र. A४३९०२३७१९२० "पदशिर्ष १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत वायु गुणवत्ता अनुदान व्यय" मधून तरतूद उपलब्ध असून प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.